AGRICON

AGRO CLINIC & FARMING SOLUTIONS

## ● जमिनीच्या आरोग्यासाठी करा माती परीक्षण

माती परीक्षण करण्याच्या फायद्यांसोबतच त्याचे महत्त्व,फायदे, मातीचा नमुना केव्हा, कधी, कुठे, कसा घ्यावा याचे तांत्रिक ज्ञान असणेही महत्त्वाचे आहे.
कारण माती परीक्षणावरुन जमिनीची सुपीकता, उत्पादकता आणि आरोग्य समजते व पुढील पीक नियोजन करता येते.

▶ माती परीक्षण म्हणजे शेतातील मृदा नमुन्यांची तपासणी करून त्यातील उपलब्ध मुख्य, दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांचे प्रमाण तपासून अहवालानुसार पिकाचे व खतांचे नियोजन करणे.

▶ माती परीक्षण अहवालावरुन जमिनीचा कस, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण यासोबतच जमीन आम्लधर्मी, क्षारयुक्त किंवा चोपण आहे याचे निदान करता येते. एकंदरीत माती परीक्षणावरुन जमिनीची सुपीकता, उत्पादकता आणि आरोग्य समजते.

▶ पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या अन्नद्रव्यांचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा कमी दिल्यास पिके चांगली येत नाहीत. अन्नद्रव्ये प्रमाणापेक्षा जास्त दिल्यास सुपीकतेवर परिणाम होतो आणि त्याचे दुष्परिणाम पिकांच्या वाढीवर दिसून येतात आणि खर्चही वाढतो.

▶ जमिनीत अन्नद्रव्याचे प्रमाण किती आहे व त्यावरुन कोणते खत वापरावे, किती खत वापरावे, कोणते पीक घ्यावे ही माहिती आपल्याला माती परीक्षण केल्याने समजते. – माती परीक्षणाचे निष्कर्ष योग्य येण्यासाठी आपल्या शेताचा प्रातिनिधिक मृद नमुना घेणे ही माती परीक्षणातील प्राथमिक परंतु अत्यंत महत्त्वाची बाब आहे.



RB GRAPHICS ▼ 9850974395

**राजेश डी. पवार**
-संचालक AGRICON